अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड । शुक्रवार
२३.१०.२०२६
वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा
RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 9763157712
वर्ष: ०७ | अंक: २६३ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
संपादक - चंद्रकांत भा. भड
+91 7745067712

# चर्चेविना निर्णय घेतल्याचा निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यावर आरोप

## आरटीआयमधून खुलासा, २ निवडणूक आयुक्तांनी कॅबिनेट सचिवांकडे तक्रार केली, पण कारवाई झालीच नाही

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**नवी दिल्ली** - निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांच्या कामकाजा संदर्भातील एका वादाबाबत आणखी एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी यांनी वरिष्ठ उप निवडणूक आयुक्त मनीष गर्ग यांच्या विरोधात कॅबिनेट सचिवालयात तक्रार दाखल केली होती. मात्र, कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. ही माहिती निवृत्त कमोडोर लोकेश के. बत्रा यांना मिळालेल्या आरटी आयच्या उत्तरातून उघड झाली आहे. दोन्ही आयुक्तांनी २९ जुलै २०२६ रोजी कॅबिनेट सचिव टी. व्ही. सोमनाथन यांना स्वतंत्र पत्रे लिहिली होती. असा आरोप होता की, मनीष गर्ग यांनी निवडणूक आयोग किंवा संबंधित अधिकाऱ्यांशी सल्लामसलत न करता वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कामाच्या वाटपात बदल करण्याचा आदेश जारी केला होता. मात्र, कॅबिनेट सचिवालयाने म्हटले आहे की, या तक्रारी संपूर्ण निवडणूक आयोगाच्या वतीने नव्हे, तर दोन्ही आयुक्तांनी वैयक्तिकरित्या पाठवल्या होत्या. त्यामुळे, ही कारवाई आयोगा सारख्या घटनात्मक संस्थेच्या कामकाजात हस्तक्षेप मानली जाऊ शकते. संपूर्ण प्रकरण ५ मुद्द्यांमध्ये समजून घ्या

**तक्रार कोणी दाखल केली?**

निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी यांनी २९ जुलै, २०२६ रोजी कॅबिनेट सचिव टी. व्ही. सोमनाथन यांना स्वतंत्र पत्रे लिहिली.

**कोणाविरुद्धः वरिष्ठ उप निवडणूक आयुक्त मनीष गर्ग**

**आरोप काय होते?**

दोन्ही निवडणूक आयुक्तांनी आरोप केला की, मनीष गर्ग यांनी आयोगाशी किंवा संबंधित अधिकाऱ्यांशी सल्लामसलत न करता वरिष्ठ अधिकाऱ्यांमधील कामाची विभागणी बदलण्याचा आदेश जारी केला. या बदलामुळे मतदारयादी आयटी प्रणालीच्या देखरेख आणि कामकाजाच्या केंद्रीकरणाबद्दलही चिंता व्यक्त करण्यात आली.

**कॅबिनेट सचिवालयाने कारवाई केली नाही**

३ ऑगस्टच्या एका फाईल नोटिंगमध्ये नमूद केले आहे की, तक्रारी दोन्ही आयुक्तांनी वैयक्तिकरित्या दाखल केल्या होत्या, संपूर्ण निवडणूक आयोगाच्या वतीने नाही. त्यामुळे, अशी कारवाई घटनात्मक संस्थेच्या कामकाजात हस्तक्षेप मानली जाऊ शकते. तक्रारींवर कोणतीही तत्काळ कारवाई करण्यात आली नाही. दोन्ही आयुक्तांना पत्रे मिळाल्याची माहिती देण्यात आली आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यालयातही प्रती पाठवण्यात आल्या.

**निवडणूक आयोगाने दुसऱ्याच दिवशी आपला आदेश मागे घेतला**

३० जुलै रोजी, दोन्ही निवडणूक आयुक्तांनी मनीष गर्ग यांचा कार्यविभागणीचा आदेश रद्द केला. तसेच, जोपर्यंत आयोग कोणत्याही बदलांवर सहमत होत नाही, तोपर्यंत पूर्वीचीच पद्धत कायम ठेवण्याचे निर्देशही त्यांनी दिले. गर्ग यांची २०२४ मध्ये निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती मनीष गर्ग हे हिमाचल प्रदेश केडरचे १९९६ बॅचचे आयएएस अधिकारी आहेत.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे भाजपला अमान्य, मंत्री आशिष शेलार यांचं वक्तव्य

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**मुंबई** - मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी माध्यमांसमोर ऐकवलेल्या ऑडिओ क्लिपची सत्यता तपासून तिची सखोल चौकशी करावी, अशी मागणी भाजपचे नेते आणि सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी गुरुवारी केली.

या क्लिपमध्ये करण्यात आलेला दावा १०० टक्के खोटा असून, त्यात भाजपच्या कोणत्याही नेत्याचा आवाज नाही, असा दावाही त्यांनी केला. तसेच, महायुतीचे नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करणे भाजपला मान्य नसल्याचे शेलार यांनी स्पष्ट केले.

जरांगे यांनी संबंधित ऑडिओ क्लिप सार्वजनिक केल्यानंतर उद्योगमंत्री उदय सामंत यांनीही त्यातील उल्लेखांची चौकशी करण्याची मागणी केली होती. त्यावर प्रतिक्रिया देताना शेलार यांनी क्लिप बाहेर आली कशी, तिची सत्यता किती आहे आणि ती तयार करताना तंत्रज्ञानाचा वापर झाला आहे का, याची तपासणी होणे आवश्यक असल्याचे सांगितले.

ही क्लिप चुकीच्या किंवा अवैध पद्धतीने तयार करण्यात आली आहे का, ती आताच सार्वजनिक करण्यामागे काय कारण आहे आणि जरांगे यांच्यापर्यंत ती कशी पोहोचली, या प्रश्नांची उत्तरेही शोधली पाहिजेत, असे ते म्हणाले. 'ज्या ऑडिओ क्लिपची सत्यता अद्याप निश्चित झालेली नाही, तिच्या समर्थनार्थ कोणताही पूरक पुरावा समोर आलेला नाही, त्या क्लिपच्या आधारे निष्कर्ष काढता येणार नाही.

क्लिपमधील तथाकथित चर्चेशी भाजप सहमत नाही. या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, हीच आमची भूमिका आहे,' असे शेलार यांनी स्पष्ट केले. जरांगे यांच्याकडे या प्रकरणासंदर्भात जे काही पुरावे असतील, ते त्यांनी तपास यंत्रणांकडे द्यावेत, असे आवाहनही त्यांनी केले. उदय सामंत यांच्या विधानाबाबत बोलताना शेलार यांनी त्यांचा गैरसमज झाला असावा, असे म्हटले.

# तुळजाभवानीच्या दर्शनासाठी पायी जाणाऱ्या भाविकांना कंटेनरने चिरडलं

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

## एकाचा मृत्यू, ६ जखमी; धाराशिवमध्ये भीषण अपघात!



**धाराशिव** - तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी पायी जात असलेल्या भाविकांना कंटेनरने पाठीमागून जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत एका भाविकाचा जागीच मृत्यू झाला असून ६ जण जखमी झाले आहेत. सोलापूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वरील नळदुर्ग बायपासजवळ ही दुर्घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, कर्नाटकातील बसवकल्याण येथून काही भाविक तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी तुळजापूरच्या दिशेने पायी जात होते. यावेळी नळदुर्ग बायपासजवळ मागून आलेल्या कंटेनरने या भाविकांना चिरडले. या धडकेत एका भाविकाचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य ६ जण जखमी झाले.

अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी मदतकार्य सुरू करण्यात आले. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातानंतर घटनास्थळी पोलीस दाखल झाले. त्यांनी मजुरांना जखमी अवस्थेत कंटेनरखालून बाहेर काढले. घटनेनंतर परिसरात गोंधळाचे वातावरण होते. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, दुर्घटनेबाबत अधिक माहिती समोर येणे बाकी आहे. काही दिवसांपूर्वी तुळजापुरला दर्शनासाठी जाणाऱ्या एका कारला बसने धडक दिल्याने पाच जणांचा मृत्यू झाला होता. राष्ट्रीय महामार्गावरच तोही अपघात झाला होता. अवघ्या काही दिवसात पुन्हा एकदा अशाच प्रकारची घटना घडल्याने खळबळ उडाली आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगराध्यक्षाकडून शिंदेसेनेच्या नगरसेवकाच्या भावाला बेदम मारहाण

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

## परभणीत अंकुश लाडसह सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल



**मुंबई** - परभणी जिल्ह्यातील मानवत शहरातील राजकीय वतुर्ळात खळबळ उडवणारी घटना समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगराध्यक्षांचे पती तथा नगर परिषदेचे विद्यमान उपाध्यक्ष अंकुश लाड यांनी आपल्या समर्थकांसह शिंदे सेनेच्या नगरसेवकाच्या भावाला बेदम मारहाण केल्याचे समोर आले आहे. भरदुपारी घडलेली मारहाणीची घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, या व्हिडिओने सध्या जोरदार चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान, या प्रकरणी मानवत पोलीस ठाण्यात नगराध्यक्षांचे पती तथा उपाध्यक्ष अंकुश लाड यांच्यासह सात जणांविरुद्ध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.






# जिल्हास्तरीय रंगभरण स्पर्धेमध्ये स्वामी विवेकानंद मानवता गुरुकुलचा डंका!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – जिल्हास्तरीय रंगभरण स्पर्धेत घवघवीत यश संपादन करीत ढगा येथील स्वामी विवेकानंद मानवता गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांची छाप उमटवली आहे. कलाजीवन बहुउद्देशीय संस्था यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही 'विघ्नहर्ता उत्सवा'निमित्त आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय



रंगभरण स्पर्धेत गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. गट-अ मधून युगल अशोकराव वाळूलकर हिने जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावुन गुरुकुलच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

या स्पर्धेत गुरुकुलच्या एकूण ६० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला होता. जिल्हाभरातील शेकडो विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे स्पर्धेत चुरस निर्माण झाली होती. गट-अ मधून युगल अशोक वाळूलकर हिने प्रथम क्रमांक मिळवुन जिल्हास्तरावर गुरुकुलचा नावलौकिक वाढविला. याच गटात प्रियांशु रोशन राऊत आणि प्रियांशु विशाल चाटरकर यांनी उत्तेजनार्थ पुरस्कार प्राप्त केले.

याप्रसंगी कलाजीवन बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा चित्रकार युवराज ठाकरे, मुख्याध्यापक नितीन ठाकरे, गुरुकुलचे संस्थापक रंजित इंगोले, शिक्षिका कविता वंजारी, रुपाली बघेल, हर्षा वंजारी, ऋतुजा घोरमाडे आणि उदय घोरमाडे उपस्थित होते. रंगभरणासारख्या कलात्मक स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळते, रंगसंगतीचे ज्ञान विकसित होते आणि आत्मविश्वास वाढतो. स्वामी विवेकानंद मानवता गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी मिळिवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी ठरणारे आहे.

# पाणी गुणवत्तेत्त पश्चिम रेल्वे 'स्वच्छ'च

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – पश्चिम रेल्वेने १ सप्टेंबर ते २० ऑक्टोबर या कालावधीत आपल्या नेटवर्कवर केलेल्या १८,६१० पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्ता चाचण्यांमध्ये १००% यश मिळवल्याचे जाहीर केले आहे. यामध्ये 'रेसिड्युअल क्लोरीन' आणि जिवाणूविषयक प्रदूषणा बाबतच्या चाचण्यांचा समावेश होता. रेल्वे प्रशासनाच्या म्हणण्यानुसार, या चाचण्यांचे निकालानुसार, संबंधित कालावधीत घेतलेले पाण्याचे नमुने सर्व निर्धारित मानकांवर उत्तीर्ण झाले आहेत.

पश्चिम रेल्वेच्या वैद्यकीय विभागाने पाणी निर्जंतुकी करणाची परिणामकारकता तपासण्यासाठी १५,९३६ 'रेसिड्युअल क्लोरीन' चाचण्या केल्या, ज्यामध्ये सर्व नमुने यशस्वी ठरले. याव्यतिरिक्त, सूक्ष्मजीवविषयक सुरक्षितता तपासण्यासाठी २,६७४ जिवाणूविषयक चाचण्या करण्यात आल्या; यामध्येही १००% यश मिळाले. ही देखरेख रेल्वे स्थानके आणि रेल्वे वसाहतींमधील पिण्याच्या पाण्याच्या सुविधांवर करण्यात आली होती.

या दोन प्रकारच्या चाचण्यांचे उद्देश वेगवेगळे आहेत. 'रेसिड्युअल क्लोरीन' चाचणीद्वारे पाण्यात निर्जंतुकीकरणासाठी पुरेसे क्लोरीन शिल्लक आहे का, हे तपासले जाते; तर जिवाणूविषयक विश्लेषणाद्वारे आरोग्यास घातक ठरू शकणारे सूक्ष्मजीव शोधले जातात.

# संविधानाचे नि:शुल्क वितरण : ग्रंथपालांचा सन्मान

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मोर्शी** – धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त भीमाची लेकर ऑर्गनायझेशन, नागपूरतर्फे २० ऑक्टोबर रोजी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन, संविधानाच्या प्रतींचे नि:शुल्क वितरण, ग्रंथपालांचा सन्मान आणि दीक्षाभूमीवर आलेल्या बौद्ध अनुयायांसाठी भोजनदान करण्यात आले.





कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.रामदास लिहितकर, तर उद्घाटक म्हणून प्रा.डॉ.सत्यप्रकाश निकोसे उपस्थित होते. यावेळी नऊ सेवानिवृत्त ग्रंथपाल, पाच पीएच.डी. मार्गदर्शक आणि १९ पीएच.डी.प्राप्त ग्रंथपालांचा सत्कार करण्यात आला. डॉ.दिगंबर खोब्रागडे यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. तसेच संस्थेच्या 'संविधान युग' या वार्षिकाचे प्रकाशन करण्यात आले. या उपक्रमातून संविधानिक मूल्ये, समता, बंधुता आणि मानवसेवेचा संदेश देण्यात आला. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# मोर्शी उपजिल्हा रुग्णालयात एकाच दिवशी २० रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया!

## महात्मा फुले जनआरोग्य व आयुष्मान भारत योजनेंतर्गत विशेष शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मोर्शी** – ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना दर्जेदार आणि परवडणाऱ्या आरोग्य सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने उपजिल्हा रुग्णालय, मोर्शी येथे १८ ऑक्टोबर २०२६ रोजी महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेंतर्गत विशेष शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकाच दिवशी एकूण २० रुग्णांवर गर्भाशय, अपेंडिक्स तसेच इतर आवश्यक सामान्य शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या करण्यात आल्या. त्यामुळे



परिसरातील गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे.

आर्थिक अडचणीमुळे कोणत्याही रुग्णाला आवश्यक उपचारांपासून वंचित राहावे लागू नये, तसेच शस्त्रक्रियेसाठी मोठ्या शहरांतील रुग्णालयांमध्ये जाण्याची गरज भासू नये, हा या शिबिरामागील प्रमुख उद्देश होता. शासनाच्या आरोग्य योजनांच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्यांना गुणवत्तापूर्ण उपचार उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला.

हे शस्त्रक्रिया शिबिर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रमोद निरवणे तसेच निवासी बाह्यसंपर्क अधिकारी डॉ.संदीप हेडाऊ यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले. उपजिल्हा रुग्णालय, मोर्शीचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रमोद पोतदार यांच्या मार्गदर्शनात मोर्शी व वरूड येथील वैद्यकीय समन्वयक डॉ.घनश्याम मानकर, डॉ.प्रेरणा वानखेडे, वशिम शेख आणि प्रकाश पांडे यांनी समन्वय साधला.

शिबिराच्या यशस्वितेसाठी डॉ.प्रेमा पाटील, संदीप पवार, प्रतीक्षा पांचाळे, रेशमा बहुरुपी, मीनाक्षी मेश्राम, स्मिता पकडे, रुपाली गुल्हाणे, अंकित नवरे, दीपिका गोटे, सागर झटाले, नौशाद खान, हबीब खान, ज्ञानेश्वर टाकळे, नागोराव खडसे, विद्या राऊत, शीला राऊत, संगीता तायवाडे, प्रवीण कापडे आणि शोभा इंगळे यांच्यासह संबंधित वैद्यकीय अधिकारी, परिचर्या कर्मचारी व इतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

स्थानिक पातळीवरच शस्त्रक्रियेसह आवश्यक उपचार उपलब्ध झाल्याने मोर्शी व परिसरातील गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळाला असून, शासकीय आरोग्य योजनांचा लाभ अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने हे शिबिर महत्त्वपूर्ण ठरले.

## महिलाविषयक कायद्यांवर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन

# महिलांनी आपल्या कायदेशीर हक्कांबाबत जागरूक राहावे : ॲड.मंजुषा खांडेकर

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मोर्शी** –महिला तक्रार निवारण कक्ष व अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या वतीने महिलाविषयक कायद्यांवर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



महिलांना त्यांच्या कायदेशीर हक्कांची, अधिकारांची तसेच महिलांच्या संरक्षणासाठी असलेल्या विविध कायद्यांची माहिती करून देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संतोष आगरकर यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.रजनीश बांबोळे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून ॲड.मंजुषा खांडेकर उपस्थित होत्या, तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ.अरविंद पाझारे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.लाजवंती टेंभुर्णे यांनी केले. त्यांनी महिलाविषयक कायद्यांचे महत्त्व स्पष्ट करताना महिलांमध्ये कायदेशीर हक्कांविषयी जागरूकता निर्माण करण्याची आवश्यकता अधोरेखित केली. महिलांनी आपल्या हक्कांची माहिती करून घेऊन अन्यायाविरुद्ध योग्य मार्गाने आवाज उठवावा, असे त्यांनी प्रतिपादन केले.

प्रमुख मार्गदर्शक ॲड.मंजुषा खांडेकर यांनी महिलांच्या संरक्षणासाठी असलेल्या विविध कायद्यांविषयी मार्गदर्शन केले. तसेच महिलांना कायदेशीर अडचणींचा सामना करताना उपलब्ध असलेल्या उपाययोजना आणि तक्रार निवारण प्रक्रियेची माहिती करून देण्यावर भर दिला. आयुष्य जगतांना सोई व सवलती घेतल्या पाहिजे व त्यासाठी कायदयाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. जीवन आपल्याला जगता आले पाहिजे. असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणातून डॉ.रजनीश बांबोळे यांनी महिलांनी आपले हक्क अधिकार वाचून जाणून घेतले तर त्यांना जीवनात येणाऱ्या अडचणी सहजपणे सोडविता येतात व यासाठी त्यांनी संविधानाचे वाचन करावे असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांमध्ये कायदेशीर जागरूकता निर्माण करण्यासह त्यांच्या अधिकाराविषयी आत्मविश्वास वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला. अशा मार्गदर्शन कार्यक्रमांमुळे महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव होऊन सुरक्षित व न्याय्य वातावरण निर्माण करण्यास मदत होते.

## न्यू कॅलिफोर्निया इंग्लिश प्रायमरी स्कूल येथे

# भव्य गरबा नाईटचे आयोजन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – गुरुसेवा शैक्षणिक विकास संस्था द्वारा संचालित न्यू कॅलिफोर्निया इंग्लिश प्रायमरी स्कूल येथे उत्कृष्ट असे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे नियोजन संस्थेचे पदाधिकारी व शाळेचे मुख्याध्यापक यांच्या माध्यमातून करण्यात आले तसेच तीन दिवसीय वर्कशॉप नितीन मनोहरे यांच्या मार्गदर्शनातून राबवल्या गेला. यानुसार या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या गरबा नाईटमध्ये वर्ग १ ते १० पर्यंतच्या विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदवून आपला उत्साह द्विगुणित केला. पालक वर्ग व इतर गावकरी महिला व पुरुषांनी सुद्धा या गरबा नाईटचा आनंद घेऊन



कार्यक्रमाविषयी सकारात्मक प्रतिसाद देऊन कार्यक्रम राबवल्याबद्दल शाळेचे आभार पालकां तर्फे मानण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन विद्यार्थीनी आर्या अमोल निंभोरकर व भक्ती राहुल वानखडे यांनी केले. सुरुवातीला याप्रसंगी नितीन मनोहरे व सर्व अतिथी यांच्या हस्ते दुर्गा पूजन करुन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. या गरबा नाईटसाठी विद्यार्थी व इतर पालकांना शाळेतर्फे पास उपलब्ध करून देण्यात आली. सर्व कार्यक्रम हा अतिशय शांततेने पार पडला. याप्रसंगी पालकांनी कार्यक्रमाचे भरभरून कौतुक केले.



**वरुड :** प्रसिध्द वैद्यकीय तज्ञ डॉ.अमोल वैद्य यांना वाढदिवस निमित्ताने पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना बालरोग तज्ञ डॉ.प्रविण चौधरी तथा प्रसिध्द स्त्रि रोग व प्रसुती तज्ञ डॉ.समता चौधरी.

# देखभाल आणि दुरुस्तीचा खर्च कमी करण्यासाठी एसटी महामंडळाचा निर्णय

## उर्वरित ८ बसचेही रुप बदलणार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मोर्शी** – वातानुकूलित प्रवासासाठी सुरू करण्यात आलेल्या शिवशाही बस आता टप्प्याटप्प्याने लालपरीच्या रूपात धावणार आहेत. वाढता देखभाल व दुरुस्तीचा खर्च आणि वारंवार उद्भवणाऱ्या



तांत्रिक अडचणी लक्षात घेऊन एसटी महामंडळाने हा निर्णय घेतला आहे.

अमरावती विभागातील एकूण ३९ शिवशाही बसपैकी आतापर्यंत ३१ बसचे रूपांतर साध्या लाल रंगाच्या एसटी बसमध्ये करण्यात आले आहे. अमरावती, बडनेरा, दर्यापूर, परतवाडा आणि वरूड या आगारांमधील बसचा यात समावेश आहे. उर्वरित आठ बसचे रूप बदलण्यासाठी त्या नागपूर येथील एसटी महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यशाळेत पाठविण्यात येणार आहेत.

शिवशाही बसमध्ये आरामदायी आसने, सीसीटीव्ही, डिजिटल डिस्प्ले आणि मोबाइल चार्जिंगसारख्या सुविधा होत्या. मात्र, या सुविधांच्या देखभालीसह तांत्रिक बिघाडांमुळे महामंडळाचा खर्च वाढत असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी बसचे बाह्यरूप बदलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एसटी महामंडळाच्या अमरावती विभागातील यांत्रिकी विभागाचे नरसिंग चव्हाण यांनीही देखभाल आणि दुरुस्तीचा वाढता खर्च लक्षात घेऊन वरिष्ठ स्तरावर हा निर्णय घेतल्याची माहिती दिली.

# संपादकीय

**{ मदत करताना कधीही प्रसिद्धीची अपेक्षा करु नका. }**

## विकासाच्या वाटेवर पर्यावरणाचा बळी?

विकास हवा, पण निसर्गाचा विनाश करून नव्हे! आज भारत वेगाने विकासाच्या दिशेने वाटचाल करीत आहे. मोठमोठे महामार्ग, औद्योगिक प्रकल्प, उंच इमारती, शहरांचा विस्तार आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून देशाच्या प्रगतीची नवी दालने खुली होत आहेत. विकास ही काळाची गरज आहे, यात शंका नाही. मात्र, या विकासाच्या झगमगाटात निसर्गाचा हिरवा शालू उतरवला जात असेल, तर या प्रगतीच्या दिशेचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. कारण प्रश्न केवळ वृक्षतोडीचा किंवा प्रदूषणाचा नाही, तर मानवी अस्तित्वाच्या भविष्याचा आहे. विकास आणि पर्यावरण हे परस्परविरोधी नसून एकमेकांना पूरक असायला हवेत. मात्र, अनेकदा विकासाच्या नावाखाली जंगलांचा ऱ्हास, वृक्षतोड, जलस्रोतांचे प्रदूषण आणि जमिनीची नासधूस होताना दिसते. उद्योग उभे राहतात, रस्ते रुंद होतात, बांधकामे वाढतात; पण त्याच वेळी निसर्गाचा समतोल बिघडत असेल, तर अशा विकासाच्या शाश्वततेवर निर्माण होते. वृक्ष हे केवळ निसर्गाचे सौंदर्य वाढवणारे घटक नाहीत, तर ते पृथ्वीच्या जीवनचक्राचा अविभाज्य भाग आहेत. झाडांमुळे हवा शुद्ध राहते, पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत होते, मातीची धूप रोखली जाते आणि असंख्य पशुपक्ष्यांना निवारा मिळतो. तरीही रस्ते, इमारती आणि विविध प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड केली जाते. वृक्षतोडीनंतर पर्यायी वृक्षलागवडीचे आश्वासन दिले जाते; परंतु केवळ रोपे लावून पर्यावरणाचे नुकसान भरून निघत नाही. लावलेल्या रोपांचे संगोपन, त्यांचे संवर्धन आणि त्यांना मोठे होण्यासाठी आवश्यक असलेला कालावधी यांनाही तितकेच महत्त्व आहे. आज हवामानातील अनिश्चितता, वाढते तापमान, अनियमित पाऊस, पाणीटंचाई आणि प्रदूषण यांसारखी आव्हाने अधिक गंभीर होत आहेत. या सर्व समस्यांना केवळ वृक्षतोडच कारणीभूत आहे, असे म्हणता येणार नाही; मात्र जंगलांचा ऱ्हास आणि नैसर्गिक संसाधनांचा अवाजवी वापर या संकटांची तीव्रता वाढवू शकतात. निसर्गाच्या मर्यादांकडे दुर्लक्ष केल्यास त्याचे परिणाम शेती, आरोग्य, पाणीपुरवठा आणि अर्थव्यवस्थेवरही होतात. औद्योगिकीकरणाला विरोध करणे हा पर्यावरण संरक्षणाचा मार्ग नाही. उद्योगांमुळे रोजगार निर्माण होतो, अर्थव्यवस्थेला चालना मिळते आणि समाजाच्या गरजा पूर्ण होतात. परंतु उद्योग उभारताना पर्यावरणीय परिणामांचा अभ्यास, प्रदूषण नियंत्रण, सांडपाण्यावर प्रक्रिया, ऊर्जा बचत आणि नैसर्गिक संसाधनांचा काटकसरीने वापर या बाबींना प्राधान्य दिले पाहिजे. विकास प्रकल्पांची आखणी करताना पर्यावरणीय नियमांचे पालन केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात झाले पाहिजे.




# भूजलाची घटती पातळी, पाण्याचे नियोजन आणि जलसंवर्धन ही काळाची गरज

पाणी म्हणजे जीवन, पाणी म्हणजे निसर्गाचा अमूल्य ठेवा आणि पाणी म्हणजे मानवी अस्तित्वाचा आधार. पृथ्वीवर सजीवसृष्टी टिकून राहण्यासाठी पाण्याइतका महत्त्वाचा घटक दुसरा नाही. मात्र, आज विकासाच्या वेगवान प्रवासात आणि बदलत्या जीवनशैलीत पाण्याचे महत्त्व आपण विसरत चाललो आहोत का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. वाढती लोकसंख्या, अनियंत्रित पाणीवापर, भूजलाचा अतिउपसा, जंगलांचा ऱ्हास आणि पावसाच्या बदलत्या स्वरूपामुळे जलसंकटाची समस्या अधिक गंभीर होत आहे. त्यामुळे आजच पाण्याचे योग्य नियोजन केले नाही, तर उद्याचे भविष्य अडचणीत येऊ शकते.

पाण्याचा प्रत्येक थेंब अनमोल आहे; त्याचे संवर्धन ही केवळ गरज नसून प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. भूजलाची घटती पातळी : चिंतेचा विषय भारत हा कृषिप्रधान देश आहे. देशातील मोठ्या लोकसंख्येचे जीवन शेतीवर अवलंबून आहे. शेतीसाठी पाणी आवश्यक असल्याने विहिरी, बोअरवेल आणि इतर भूजलस्रोतांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. मात्र, अनेक भागांत पाण्याचा उपसा नैसर्गिक पुनर्भरणापेक्षा अधिक होत असल्याने भूजलपातळी घटण्याचा धोका वाढत आहे. पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास पुरेशा संधी न मिळाल्यास ही परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते.

पूर्वी गावांमध्ये विहिरी, तलाव, बारव आणि पारंपरिक जलस्रोत मुबलक प्रमाणात आढळत असत. या जलस्रोतांमुळे पिण्याच्या पाण्याची तसेच शेतीची गरज भागवण्यास मदत होत असे. कालांतराने वाढते बांधकाम, सिमेंटचे रस्ते, मोकळ्या जमिनींचे कमी होणारे प्रमाण आणि जलस्रोतांकडे झालेले दुर्लक्ष यांमुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याच्या प्रक्रियेला अडथळे निर्माण झाले. परिणामी, पाणीटंचाईचे संकट अनेक भागांत जाणवू लागले आहे.

पावसाचे पाणी वाहून जाते, आपण मात्र तहानलेले राहतो!

आपल्या देशात पावसाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर पाणी उपलब्ध होते. मात्र, पावसाचे पाणी योग्य पद्धतीने साठवले आणि जमिनीत मुरवले नाही, तर त्यातील मोठा भाग वाहून जातो. पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होते, तर उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागतो. ही परिस्थिती पाण्याच्या कमतरतेबरोबरच नियोजनातील त्रुटींचीही जाणीव करून देते. पावसाचे पाणी साठवण्यासाठी शेततळी, बंधारे, नाला खोलीकरण, जलसंधारणाची कामे आणि घरांवरील पावसाचे पाणी साठवण्याच्या योजना प्रभावी ठरू शकतात. मात्र, अशी कामे करताना स्थानिक भौगोलिक परिस्थिती, पाण्याचा नैसर्गिक प्रवाह आणि पर्यावरणीय परिणाम यांचा विचार करणे आवश्यक आहे. केवळ बांधकामे उभारून चालणार नाही, तर त्यांची देखभाल आणि परिणामकारकता तपासणेही महत्त्वाचे आहे.

शेतकरी आणि जलसंकटाचे वास्तव पाण्याचा प्रश्न सर्वाधिक तीव्रतेने शेती क्षेत्रात जाणवतो. पावसावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना अनियमित पावसामुळे पेरणी, पीकवाढ आणि उत्पादनाच्या नियोजनात अडचणी




येतात. दुसरीकडे, भूजलपातळी घटल्यास सिंचनासाठी उपलब्ध पाण्यावर मर्यादा येऊ शकतात. त्यामुळे शेतीचा खर्च वाढण्याची आणि उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता असते.

या परिस्थितीत ठिबक सिंचन, तुषार सिंचन, पिकांच्या गरजेनुसार पाणी देणे, मृदसंधारण आणि स्थानिक हवामानाला अनुरूप पीकपद्धती यांचा अवलंब करणे आवश्यक आहे. प्रत्येक शेतात एकच पद्धत उपयुक्त ठरेल असे नाही. त्यामुळे कृषी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली पाण्याचे नियोजन केले पाहिजे.

शेतीसाठी पाणी उपलब्ध करून देताना पिण्याच्या पाण्याच्या गरजेलाही प्राधान्य मिळाले पाहिजे. पाणी हा अमर्याद संसाधन नसून त्याचा वापर जबाबदारीने करणे ही काळाची गरज आहे.

जलसंवर्धन : शासनासोबत जनतेचीही जबाबदारी जलसंवर्धनाची जबाबदारी केवळ शासनावर सोपवून चालणार नाही. प्रशासन, ग्रामपंचायती, शेतकरी, सामाजिक संस्था आणि नागरिक यांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. गावागावांत पाण्याचे अंदाजपत्रक तयार करून उपलब्ध पाणी, त्याची गरज आणि संभाव्य वापर यांचे नियोजन करता येऊ शकते.

गावातील तलाव, बंधारे, विहिरी आणि पारंपरिक जलस्रोत यांचे पुनरुज्जीवन केले पाहिजे. पाणीपुरवठा यंत्रणांमधील गळती रोखणे, सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा योग्य पुनर्वापर करणे आणि पाण्याचा अपव्यय टाळणे यांनाही महत्त्व दिले पाहिजे. तसेच, वृक्षसंवर्धन आणि जमिनीतील पाणी मुरण्यास मदत करणाऱ्या उपाययोजनांमुळे जलचक्राचे संतुलन राखण्यास मदत होऊ शकते.

शाळा आणि महाविद्यालयांतून विद्यार्थ्यांना जलसंवर्धनाचे महत्त्व पटवून देणे गरजेचे आहे. कारण आजची मुले ही उद्याची जबाबदार नागरिक आहेत. घरातील नळ उघडा राहू न देणे, गरजेपुरतेच पाणी वापरणे, पावसाचे पाणी साठवणे आणि इतरांनाही पाणी बचतीसाठी प्रेरित करणे अशा छोट्या कृतींमधून मोठा बदल घडवता येतो.

विकासाच्या नियोजनात पाण्याला प्राधान्य हवे शहरे वाढत आहेत, उद्योग विस्तारत आहेत आणि लोकसंख्येच्या गरजाही वाढत आहेत. अशा वेळी नवीन प्रकल्पांची आखणी करताना पाण्याची उपलब्धता आणि भविष्यातील गरज यांचा विचार केला पाहिजे. पाण्याच्या स्रोतांवर क्षमतेपेक्षा अधिक ताण पडणार नाही, याची दक्षता घेणे आवश्यक आहे. जलस्रोतांचे प्रदूषण रोखणे, नद्यांचे संरक्षण करणे आणि पाण्याचे समान व न्याय्य वाटप सुनिश्चित करणे हीदेखील विकास प्रक्रियेतील महत्त्वाची जबाबदारी आहे.

पाणीटंचाईच्या काळात केवळ टँकरवर अवलंबून राहणे हा कायमस्वरूपी उपाय ठरू शकत नाही. तात्पुरत्या उपायांसोबत दीर्घकालीन जलनियोजन, जलसंधारण आणि भूजल पुनर्भरणावर भर देणे आवश्यक आहे. प्रत्येक गाव आणि शहराने आपल्या पाण्याच्या गरजांचे नियोजन केले, तर भविष्यातील संकटांची तीव्रता कमी करण्यास मदत होऊ शकते.

पाणी ही निसर्गाने मानवाला दिलेली अमूल्य देणगी आहे. तिचा अपव्यय करणे म्हणजे आपल्या भविष्यावरच संकट ओढवून घेणे होय. आज पाण्याचे योग्य नियोजन केले, पावसाच्या प्रत्येक थेंबाचे महत्त्व ओळखले आणि जलस्रोतांचे संवर्धन केले, तरच पुढील पिढ्यांना सुरक्षित भविष्य देता येईल.

पाण्याचा प्रश्न हा केवळ उन्हाळ्यात आठवणारा प्रश्न नसून वर्षभर नियोजन करण्याचा विषय आहे. पाऊस पडल्यावर पाणी साठवणे आणि टंचाई निर्माण झाल्यावर उपाय शोधणे एवढ्यापुरती जलव्यवस्थापनाची संकल्पना मर्यादित राहू नये. जलसंवर्धन ही लोकचळवळ बनली पाहिजे.

आज पाणी वाचवले, तर उद्या जीवन वाचेल. आज जलसंवर्धन केले, तर उद्याची पिढी सुरक्षित राहील. पाण्याचा प्रत्येक थेंब जपूया, जलस्रोतांचे संवर्धन करूया आणि जलसमृद्ध भारताच्या निर्मितीसाठी कटिबद्ध होऊया.

कारण पाणी असेल तरच जीवन असेल; आणि जीवन असेल तरच भविष्य असेल!

# शेतमालाला योग्य भाव कधी मिळणार?

वाढता उत्पादन खर्च आणि शेतकऱ्यांच्या भविष्याचा प्रश्न भारत हा कृषिप्रधान देश असून शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेतात राबणारा शेतकरी संपूर्ण देशाची भूक भागवतो; मात्र त्याच शेतकऱ्याला आपल्या शेतमालाला योग्य भाव मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागतो, ही वस्तुस्थिती चिंताजनक आहे. एकीकडे बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी, इंधन आणि सिंचनाचा खर्च वाढत आहे, तर दुसरीकडे बाजारपेठेत शेतमालाच्या किमतीत चढ-उतार होत आहेत. त्यामुळे शेती परवडणारी राहावी आणि शेतकऱ्यांचे भविष्य सुरक्षित व्हावे, हा प्रश्न आज ऐरणीवर आला आहे.

घाम शेतकऱ्याचा, अन्न देशाचे; मग आर्थिक सुरक्षिततेची हमी शेतकऱ्याला कधी मिळणार? हा प्रश्न केवळ शेतीपुरता मर्यादित नसून देशाच्या अन्नसुरक्षेशी संबंधित आहे.

वाढता उत्पादन खर्च, घटणारे आर्थिक गणित शेती करणे दिवसेंदिवस अधिक खर्चिक होत आहे. पेरणीपासून काढणीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर शेतकऱ्याला पैसा खर्च करावा लागतो. पावसाची अनिश्चितता, नैसर्गिक आपत्ती, पिकांवरील रोग आणि मजुरांची




उपलब्धता यांसारख्या समस्यांमुळे उत्पादन खर्चाचे गणित आणखी बिघडते. अशा परिस्थितीत अपेक्षित उत्पादन मिळाले नाही किंवा बाजारभाव घसरले, तर शेतकऱ्याला आर्थिक नुकसान सहन करावे लागते.

शेती ही केवळ उपजीविकेचे साधन नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधार आहे. शेतकऱ्याच्या हातात पैसा आला, तर ग्रामीण भागातील व्यापार, सेवा आणि रोजगारालाही चालना मिळते. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य हे देशाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे आहे.

बाजारभावाचा प्रश्न आणि शेतकऱ्यांची कोंडी शेतमालाचे उत्पादन घेतल्यानंतर तो योग्य वेळी आणि योग्य भावात विकणे हे शेतकऱ्यांसमोरील मोठे आव्हान आहे. अनेकदा बाजारात आवक वाढल्याने दर कमी होतात. साठवणुकीच्या सुविधा, शीतगृहे, प्रक्रिया उद्योग आणि थेट बाजारपेठेपर्यंत पोहोचण्याच्या मर्यादांमुळे शेतकऱ्यांना अपेक्षित भावाची वाट पाहणे कठीण जाते.

किमान आधारभूत किंमत, बाजार समित्यांची कार्यक्षमता, पारदर्शक व्यवहार आणि शेतमालाच्या खरेदीची प्रभावी व्यवस्था यांना त्यामुळे महत्त्व प्राप्त होते. मात्र, केवळ हमीभाव जाहीर करणे पुरेसे नाही; संबंधित पिकांची प्रत्यक्ष खरेदी, शेतकऱ्यांपर्यंत योजनांची माहिती आणि वेळेवर पैसे मिळणेही तितकेच आवश्यक आहे.

शेतीला आधुनिकतेची जोड आज शेतीसमोर अनेक आव्हाने असली, तरी आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने त्यावर उपाय शोधता येऊ शकतात. ठिबक सिंचन, मृदापरीक्षण, हवामानविषयक माहिती, सुधारित साठवणूक व्यवस्था आणि कृषी प्रक्रिया उद्योग यांमुळे शेती अधिक कार्यक्षम होऊ शकते. शेतकरी उत्पादक कंपन्या आणि सहकारी संस्थांच्या माध्यमातून सामूहिक खरेदी-विक्री केल्यास खर्च कमी करण्याची आणि बाजारपेठेत सौदेबाजीची क्षमता वाढवण्याची संधी मिळू शकते.

शेतमालावर प्रक्रिया करून त्याला अधिक मूल्य मिळवून देणे, स्थानिक बाजारपेठांचा विकास करणे आणि ग्राहकांपर्यंत थेट विक्रीचे पर्याय उपलब्ध करून देणे यासाठीही प्रयत्न व्हायला हवेत.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे केवळ मदत किंवा अनुदानाच्या दृष्टिकोनातून पाहून चालणार नाही. उत्पादन खर्च, बाजारभाव, सिंचन, साठवणूक, पीकविमा आणि बाजारपेठेतील संधी या सर्व बाबींचा एकत्रित विचार करावा लागेल. शासन, कृषी संस्था, व्यापारी आणि ग्राहक यांनीही शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्याचे महत्त्व ओळखले पाहिजे.

शेतकरी समृद्ध झाला, तर ग्रामीण अर्थव्यवस्था समृद्ध होईल; ग्रामीण अर्थव्यवस्था समृद्ध झाली, तरच देशाच्या विकासाला भक्कम पाया मिळेल. शेतमालाला योग्य भाव आणि शेतीला प्रतिष्ठा मिळणे हीच खऱ्या अर्थाने कृषिप्रधान भारताची ओळख ठरली पाहिजे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# मुंबईकरांचे जीवन अधिक सुलभ करणे हेच पायाभूत सुविधा विकासाचे उद्दिष्ट

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – मुंबईला जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा असलेले आधुनिक आणि भविष्यासाठी सज्ज महानगर बनविण्याच्या दृष्टीने रस्ते, किनारी रस्ता, उड्डाणपूल आणि बोगद्यांसारख्या महत्त्वपूर्ण प्रकल्पांना गती देण्यात येत आहे. मुंबईत उत्तर – दक्षिण आणि पूर्व – पश्चिम कनेक्टिव्हिटी अधिक सक्षम करून महानगराच?या एका भागातून दुसऱ्या भागात कमीत कमी वेळेत पोहोचता यावे, मुंबईकरांचा प्रवास अधिक सुलभ व्हावा, वेळेची बचत व्हावी, यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रयत्नशील आहे. महानगराच्या विकासासाठी मुंबई महानगरपालिकेने हाती घेतलेले अनेक प्रकल्प आता अंतिम टप्प्यात आहेत. या प्रकल्पांची गती कायम ठेवणे, त्यांच्यातील अडथळे दूर करणे आणि सर्व संबंधित यंत्रणांमध्ये योग्य समन्वय राखणे, या गोष्टींना सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. पायाभूत सुविधांच्या विकासाचा खरा अर्थ म्हणजे 'इझ ऑफ लिव्हिंग' अर्थात मुंबईकरांचे जीवन अधिक सोपे, सुलभ आणि सुखकर करणे हा होय. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेने हाती घेतलेले सर्व पायाभूत सुविधा प्रकल्प ठरवलेल्या वेळेत आणि गुणवत्तेशी कोणतीही तडजोड न करता पूर्ण करावेत, असे निर्देश देखील मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.



**वरूड :** शहरातील प्रसिध्द वैद्यकीय तज्ञ डॉ.भुषण खोले यांना वाढदिवसानिमित्त्य पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना जायंटस गृप ऑफ वरुडचे माजी अध्यक्ष नितीन खेरडे, ह.भ.प.उमेश कांडलकर, श्री यशवंतबाबा विद्यालय पवनी (स.) येथील मुख्याध्यापक उमेश निस्ताने व जायंटस गृपचे महेश बोरकूटे.

# नागपुरातील बंडखोरी शमवण्यात यश, पण अनिल सोलेंच्या मतपत्रिकेवरील नावाचा भाजपला फटका बसणार? काँग्रेसच्या अभिजीत वंजारींकडून दणदणीत विजयाचा दावा

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**नागपूर** – नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघात भाजपमध्ये झालेली ऐतिहासिक बंडखोरी शमवण्यामध्ये जरी भाजप श्रेष्ठींना यश आलं असलं, आणि बंडखोर उमेदवार अनिल सोले यांनी त्यांचा पाठिंबा भाजपचे अधिकृत उमेदवार सुधाकर कोहळे यांना जाहीर केला असला, तरी मतपत्रिकेवर अनिल सोले यांचा नाव दिसून येत आहे. त्याचे कारण म्हणजे अनिल सोले यांनी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत उलटल्यानंतर त्यांचा पाठिंबा भाजप उमेदवाराला जाहीर केला होता. ही संपूर्ण घडामोड उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या ९ ऑक्टोबरच्या मुदतीनंतर झाल्यामुळे निवडणूक यंत्रणेने नियमानुसार अनिल सोले यांचे नाव मतपत्रिकेवर छापले आहे. एकूण ३८ उमेदवारांच्या यादीत ३६व्या क्रमांकावर अनिल सोले यांचे नाव असून जर एखाद्या मतदाराला त्यांना मतदान करायचे असेल, तर तो करू शकतो. कारण त्यांचे नाव मतपत्रिकेवर आहे. विशेष म्हणजे यापूर्वीही अशाच पाठिंबा जाहीर केलेल्या उमेदवाराला काही हजार मतं पडल्याचे उदाहरण नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत घडले आहे. त्यामुळे भाजप उमेदवाराला पाठिंबा देत स्वतःला निवडणुकीच्या रिंगणातून बाजूला असल्याचे जाहीर करणारे अनिल सोले आजच्या मतदान प्रक्रियेत किती मतदान मिळवतात हे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट येथे प्रि-प्रायमरी विभागात

# नवरात्रोत्सवा निमित्त गरबा उत्सव उत्साहात



(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**वरुड** – स्थानिक न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट येथे प्रि-प्रायमरी विभागात नवरात्रोत्सवा निमित्त गरबा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांसोबत पालकांनी सुद्धा मोठ्या प्रमाणात हजेरी लावली. मोठया संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद द्विगुणीत केला.

गरबा हा नवरात्रोत्सवातील एक पारंपरिक नृत्यप्रकार आहे. गरबा नृत्याद्वारे दुर्गा देवीची भक्ती आणि आराधना केली जाते. गरबा हा शक्ती, आनंद आणि एकतेचे प्रतीक आहे. या उत्सवातून आपल्याला भारतीय संस्कृती आणि परंपरेचे महत्त्व समजते. यावेळी विद्यार्थ्यांनी त्यांच्या पालकांसोबत पारंपरिक वेशभूषा परिधान करुन गरबा आणि दांडियाच्या तालावर सुंदर नृत्य सादर केले.

रंगीबेरंगी पोशाख, पारंपरिक संगीत आणि विद्यार्थ्यांचा उत्साह यामुळे संपूर्ण शाळेचे वातावरण आनंदमय झाले होते. सर्व विद्यार्थी व पालकांनी या उत्सवात उत्स्फूर्त सहभाग घेतला. तसेच मुख्याध्यापिका माधुरी भोंडे, समन्वयक श्वेता गणोरकर, प्री प्रायमरीचे कॉर्डिनेटर पराग भोंडे, शाळेचे पी.आर.ओ किशोर देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ.राम गोधने, माजी अध्यक्ष गोपाल वानखडे, उपाध्यक्ष सुधाकर ठाकरे, सचिव अनिल गुल्हाने, सहसचिव श्याम खंडेलवाल, कोषाध्यक्ष डॉ.वेदांत राजोरिया, सदस्य विनय यावलकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष सहकार्य केले.

### सोने-चांदीचे दर

| | |
|---|---|
| शुध्द सोने | -९६१०८१० रु.(१०ग्रॅम) |
| २२.कॅ सोने | - ९४,७०० रु.(१०ग्रॅम) |
| चांदी | - १,३०,००० रु. (प्र.किलो) |

### कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव ( क्विंटलमध्ये )

| | | |
|---|---|---|
| ज्वारी - | १६५० - | २००० |
| गहू - | २५०० - | ३००० |
| तूर - | ६१०० - | ६३९० |
| मूग - | ६५०० - | ७००० |
| उडीद - | ६००० - | ७००० |
| हरभरा - | ५६०० - | ५९०० |
| सोयाबिन - | ४१०० - | ४३५० |
| बाजरा - | २००० - | २३०० |
| तिळ - | ८२०० - | ९३०० |
| भुईमूग - | ५१५० - | ५३५० |
| मका - | २२०० - | २३०० |

## बारामतीच्या माळेगावात येत्या २५ ऑक्टोबरला

# प्रसिध्द मनोविकास तज्ज्ञ डॉ.शिवा पुंडकर यांचे व्याख्यान

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**वरुड** – बारामती तालुक्यात माळेगावात येत्या २५ ऑक्टोबरला मुळचे वरुड येथील रहिवाशी प्रसिध्द मनोविकास तज्ज्ञ डॉ.शिवा माया पुंडकर यांचे 'मन आणि माणुस' विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

मनाची शक्ती आणि माणसाचे आयुष्य, सकारात्मक विचारांचे महत्व आणि मानिसक स्वास्थ्य आणि आनंदी जीवन हे या व्याख्यानाचे मुख्य मुद्दे असणार आहे. माळेगांवच्या श्री शिवाजी महाराज सभागृहात शिवनगर विद्या प्रसारक मंडळ, माळेगाव, बारामती यांच्या वतीने २५ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजता सुप्रसिद्ध मनोविकास तज्ज्ञ डॉ.शिवा माया पुंडकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

'मन आणि माणुस' हा या व्याख्यानाचा विषय असून, मानवी मनाची शक्ती, सकारात्मक विचारांचे महत्त्व आणि मानसिक स्वास्थ्याच्या माध्यमातून आनंदी जीवन जगण्याचे महत्त्व यावर ते मार्गदर्शन करणार आहेत.

आजच्या धकाधकीच्या जीवनात ताणतणाव, नकारात्मक विचार आणि विविध आव्हानांचा सामना करताना मानसिक संतुलन राखणे महत्त्वाचे ठरत आहे. अशा परिस्थितीत मनाची ताकद ओळखणे, विचारांमध्ये सकारात्मकता निर्माण करणे आणि जीवनाकडे आशावादी दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या व्याख्यानातून उपस्थितांना मनोविकासासाठी उपयुक्त विचार आणि प्रेरणा मिळण्याची अपेक्षा आहे.

व्याख्यानामध्ये मनाची शक्ती आणि मानवी जीवनातील तिचे महत्त्व, सकारात्मक विचारांचा व्यक्तिमत्त्वावर होणारा परिणाम तसेच मानसिक स्वास्थ्य जपत आनंदी जीवन कसे जगता येईल, या प्रमुख मुद्द्यांवर मार्गदर्शन केले जाणार आहे. या प्रेरणादायी व्याख्यानाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.


## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील वि.वि.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( कनिष्ठ स्तर ), वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८९६/२०२६** **ने.ता.२५/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) साहिस्ता अंजुग शेख मुस्ताक, वय अं.४३ वर्ष, धंदा-घरकाम

२) अश्फाक शेख मुस्ताक शेख, वय अं.२२ वर्ष, धंदा-मजुरी

३) अनसार शेख मुस्ताक शेख, वय अं.१९ वर्ष, धंदा-मजुरी

अर्जदार क्र.१ ते ३ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :-** **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत शेख मुस्ताक शेख गुलाब, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२५/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०७/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**



## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील वि.वि.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( कनिष्ठ स्तर ), वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८९३/२०२६** **ने.ता.२५/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) रुखमा पांडुरंग परतेती, वय अं.६३ वर्ष, धंदा-घरकाम

२) हरीदास पांडुरंग परतेती, वय अं.४३ वर्ष, धंदा-मजुरी

३) देविदास पांडुरंग परतेती, वय अं.३८ वर्ष, धंदा-मजुरी

४) रामदास पांडुरंग परतेती, वय अं.३६ वर्ष, धंदा-मजुरी

अर्जदार क्र.१ ते ४ रा.गोरेगाव, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :-** **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत पांडरंग फत्तू परतेती, रा.गोरेगाव, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२५/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०७/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**



## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील वि.वि.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( कनिष्ठ स्तर ), वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.९२८/२०२६** **ने.ता.२३/११/२०२६**

**अर्जदार :-** १) इंदीरा वासुदेव निकुसे, वय अं.७४ वर्ष, धंदा-घरकाम, २) अरविंद वासुदेवराव निकुशे, वय अं.४२ वर्ष, धंदा-शेती, ३) मंदाबाई रामेश्वर सोमकुवर, वय अं.५१ वर्ष, धंदा-घरकाम, ४) सुनीता रत्नाकर बागडे, वय अं.४५ वर्ष, धंदा-घरकाम, ५) रंजना रविंद्र सोमकुवर, वय अं.४३ वर्ष, धंदा-घरकाम, ६) राकन्या राजेंद्र गोलाईत, वय अं.३९ वर्ष, धंदा-घरकाम, अर्जदार क्र.१ व २ रा.पुसली, अर्जदार क्र.३ रा.ब्रमन पिपला, ता.सौंसर, अर्जदार क्र.४ रा.सौंसर, अर्जदार क्र.५ रा.सिलोरा, ता.सौंसर, अर्जदार क्र.६ रा.सायखेडा, ता.सौंसर

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :-** **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत वासुदेव राजेराम निकुसे, रा.पुसली, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२३/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१७/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**



## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील वि.वि.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( कनिष्ठ स्तर ), वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.९२९/२०२६** **ने.ता.२६/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) संगीता अरविंद पंडागळे, वय अं.५२ वर्ष, धंदा-घरकाम

२) मयुर अरविंद पंडागळे, वय अं.३५ वर्ष, धंदा-शेती

३) सारंग अरविंद पंडागळे, वय अं.३३ वर्ष, धंदा-शेती

अर्जदार क्र.१ ते ३ रा.चांदस, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :-** **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत अरविंद भिमराव पंडागळे, रा.चांदस, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२६/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१७/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# सामायिक जमिनीच्या विक्रीसाठी सहहिस्सेदारांची संमती बंधनकारक : जमीन विक्रीतील फसवणूक टाळण्यासाठी नियमसक्ती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** – सामायिक सातबारा असलेल्या जमिनीतील हिश्श्याची विक्री करताना सर्व सहहिस्सेदारांची लेखी संमती बंधनकारक करण्यात आली आहे. तसेच भूमी अभिलेख विभागाची मोजणीची 'क' प्रत आणि 'ना-हरकत प्रमाणपत्र' अनिवार्य केले आहे.

ही कागदपत्रे नसतील, तर दुय्यम निबंधकांना नोंदणी व्यवहार नोंदविता येणार नाहीत. विक्री व्यवहारातील फसवणूक टाळण्यासाठी महसूल विभागाने हा निर्णय घेतला आहे. अनेकदा सामायिक व्यवहारात एका हिस्सेदाराने इतर सहहिस्सेदारांना न कळवता किंवा त्यांची परवानगी न घेता खरेदी-विक्रीचे व्यवहार केल्यामुळे पक्षकारांमध्ये गंभीर वाद निर्माण होत असत. यामुळे महसूल कार्यालये आणि न्यायालयांमध्ये याचिकांची संख्या प्रचंड वाढली होती.

राज्य सरकारच्या या नवीन निर्णयामुळे खरेदी-विक्री व्यवहारात पारदर्शकता येईल, कौटुंबिक तसेच आपापसांतील वाद टळतील आणि सर्वसामान्य नागरिकांची फसवणूक थांबून त्यांना कोर्टबाजीच्या नाहक त्रासापासून मोठा दिलासा मिळणार आहे.

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील वि.वि.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( कनिष्ठ स्तर ), वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८१६/२०२६** **ने.ता.२६/१०/२०२६**

**अर्जदार :-** १) राजकुमार आनंदराव सवाने, वय अं.६३ वर्ष, धंदा-मजुरी, २) पुष्पा अरविंद हनवंते, वय अं.६५ वर्ष, धंदा-घरकाम, ३) विमल निर्मलकुमार सवाने, वय अं.६५ वर्ष, धंदा-घरकाम, ४) निलेश निर्मलकुमार सवाने, वय अं.४३ वर्ष, धंदा-मजुरी, ५) पंकज निर्मलकुमार सवाने, वय अं.४१ वर्ष, धंदा-मजुरी, ६) श्रीकांत निर्मलकुमार सवाने, वय अं.३९ वर्ष, धंदा-मजुरी, अर्जदार क्र.१ ते ६ रा.पुसला, ता.वरुड

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :-** **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत आनंदराव लहानुजी सवाने व रत्नमाला आनंदराव सवाने, रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२६/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२४/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ अॅण्ड डेथ अॅक्टचे १९६९ चे कलम ८ १३ ( ३ ) नूसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायलयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब ( प्रथम श्रेणी ) यांचे न्यायालयात.**

**एम.जे.सी.क्रं.२०९/२०२६** **ने.ता.२३/११/२०२६**

**अर्जदार :-** प्रशांत बळवंतराव राऊत
वय अं.२३ वर्ष, धंदा-शिक्षण
रा.टेंभुरखेडा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** सचिव, साहेब
ग्रामपंचायत कार्यालय टेंभुरखेडा, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार **नामे प्रशांत बळवंतराव राऊत यांचा जन्म दि.१४/०४/२००३ रोजी मु.पो.टेंभुरखेडा, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ अॅण्ड डेथ अॅक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार **नामे प्रशांत बळवंतराव राऊत यांचा जन्म दि.१४/०४/२००३ रोजी मु.पो.टेंभुरखेडा, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.२६/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२२/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ अॅण्ड डेथ अॅक्टचे १९६९ चे कलम ८ १३ ( ३ ) नूसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायलयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब ( प्रथम श्रेणी ) यांचे न्यायालयात.**

**एम.जे.सी.क्रं.२१०/२०२६** **ने.ता.२६/११/२०२६**

**अर्जदार :-** निखील बळवंतराव राऊत
वय अं.२१ वर्ष, धंदा-शिक्षण
रा.टेंभुरखेडा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** सचिव, साहेब
ग्रामपंचायत कार्यालय टेंभुरखेडा, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार **नामे निखील बळवंतराव राऊत यांचा जन्म दि.०६/०६/२००५ रोजी मु.पो.टेंभुरखेडा, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ अॅण्ड डेथ अॅक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार **नामे निखील बळवंतराव राऊत यांचा जन्म दि.०६/०६/२००५ रोजी मु.पो.टेंभुरखेडा, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.२६/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२२/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ अॅण्ड डेथ अॅक्टचे १९६९ चे कलम ८ १३ ( ३ ) नूसार मृत्यूची नोंद होण्याकरीता न्यायलयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब ( प्रथम श्रेणी ) यांचे न्यायालयात.**

**एम.जे.सी.क्रं.१८९/२०२६** **ने.ता.०१/१२/२०२६**

**अर्जदार :-** रमेश मोतीराम नांदुरकर
वय अं.५८ वर्ष, धंदा-शेती
रा.उदापुर, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** सचिव, ग्रामपंचायत कार्यालय उदापुर
ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी त्यांची **आजी कौसल्याबाई बळीराम नांदुरकर यांचा मृत्यू दि.१३/०७/१९५२ रोजी उदापुर, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त मृत्यूची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ अॅण्ड डेथ अॅक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार मृत्यूची नोंद होण्याकरीता न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील मयत **कौसल्याबाई बळीराम नांदुरकर यांचा मृत्यू दि.१३/०७/१९५२ रोजी उदापुर, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.०१/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२२/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# निदर्शने, आंदोलने कामाची नाहीत : राहुल गांधी यांचे नाव न घेता अमित शहा यांची टीका

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – 'आंदोलने करून आणि धरणे धरणे धरून काहीही साध्य होत नाही. निवडणूक जिंकायची असेल तर जनतेमध्ये जाऊन त्यांच्या समस्या समजून घ्याव्या लागतील आणि कल्याणकारी योजनांवर काम करावे लागेल', अशा शब्दांत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी गुरुवारी काँग्रेस आणि आम आदमी पक्षावर निशाणा साधला. ते म्हणाले की, विरोधक राजकीय डावपेच आणि गर्दीच्या बळावर जनतेच्या जनादेशाला कोणी आव्हान देऊ शकत नाही. काँग्रेस आपल्या नकारात्मक राजकारणामुळे पुढील ३० वर्षे तरी सत्तेवर येऊ शकणार नाही, असेही त्यांनी सांगितले. शहा हे दिल्लीमध्ये यमुना पुनरुज्जीवनाशी संबंधित प्रकल्पांचे उद्घाटन आणि भूमिपूजन कार्यक्रमात बोलत होते. यावेळी त्यांनी दिल्ली जल मंडळाच्या ८,९४१ कोटी रुपयांच्या ३३ प्रकल्पांचा शुभारंभ केला.

जनतेमध्ये जा,समस्या समजून घ्या...

'ही निदर्शने, धरणे, आंदोलने करून काहीही साध्य होणार नाही. जर निवडणूक जिंकायची असेल तर जनतेमध्ये जा आणि त्यांच्या समस्या समजून घ्या. जिथे तुमचे सरकार आहे, तिथे जनतेच्या कल्याणासाठी योजना लागू करा, नाहीतर इतर ठिकाणांहूनही तुमचा सफाया होईल', असा सल्लाही त्यांनी काँग्रेस आणि आम आदमी पक्षाला दिला.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( कनिष्ठ.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.९५३/२०२६** **ने.ता.११/१२/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती मनिषा विजयराव देशमुख, वय अं.५० वर्ष, धंदा-घरकाम, रा.वाठोडा, ता.वरुड, २) हिमांशी विजयराव देशमुख, (लग्नाआधीचे नाव) सौ.हिमांशी सुयोगराव धामंदे (लग्नानंतरचे नाव), वय अं.२८ वर्ष, धंदा-गृहिणी, रा.वाठोडा, ता.वरुड, ३) अथर्व विजयराव देशमुख, वय अं.२६ वर्ष, धंदा-शिक्षण, रा.वाठोडा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत विजय गुलाबराव देशमुख, रा.वाठोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.११/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२२/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( कनिष्ठ.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.९५०/२०२६** **ने.ता.०७/१२/२०२६**

**अर्जदार :-**

१) रमेश मारोतराव बाकोडे, वय अं.६१ वर्ष, धंदा-शेती, रा.आमनेर, ता.वरुड, २) सौ.चंद्रकला रुपरावजी लोखंडे, वय अं.६७ वर्ष, धंदा-गृहिणी, रा.मोर्शीखुर्द, ता.वरुड, ३) सौ.ताराबाई बाबुलालजी गौरकर, वय अं.७० वर्ष, धंदा-गृहिणी, रा.सिल्लेवाडा (माईन), ता.सावनेर, ४) सौ.शिला तुळशीराम घोडेस्वार, वय अं.५६ वर्ष, धंदा-गृहीणी रा.वाघोडा, ता.सावनेर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत मारोतराव देवराव वाकोडे व मयत विठाबाई मारोती उर्फ मारोतराव वाकोडे, रा.आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०७/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२२/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( कनिष्ठ.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.९६०/२०२६** **ने.ता.१४/१२/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती पार्वताबाई भाऊरावजी डंबाळे, वय अं.७२ वर्ष, धंदा-गृहिणी, २) नरेंद्र भाऊरावजी डंबाळे, वय अं.४९ वर्ष, धंदा-शेती, ३) मिलींद भाऊरावजी डंबाळे, वय अं.४७ वर्ष, धंदा-शेती, ४) प्रफुल भाऊरावजी डंबाळे, वय अं.४० वर्ष, धंदा-शेती, क्र.१ ते ४ रा.काचुर्णा, ता.वरुड, जि.अमरावती, ५) सौ.वैशाली जगदिशराव डोंगरे, वय अं.४५ वर्ष, धंदा-गृहिणी, रा.पार्वती नगर, नागपूर, ता.जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत भाऊराव बकारामजी डंबाळे, रा.काचुर्णा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१४/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२२/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**Indian Succession Act U/s. 372 अन्वये वरुड येथील वि.वि.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( कनिष्ठ स्तर ), वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.९०१/२०२६** **ने.ता.१६/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) वैशाली रविंद्र भोरे, वय अं.४४ वर्ष, धंदा-घरकाम

२) क्रिष्णा रविंद्र भोरे, वय अं.१७ वर्ष, धंदा-शिक्षण

अर्जदार क्र.१ व २ रा.अकोली रोड, साई नगर, अमरावती

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :-** **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत रविंद्र केशवराव भोरे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात Indian Succession Act U/s. 372, अन्वये वारसप्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.१६/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१७/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




### स्टेट बँक ऑफ इंडियाच्या ग्राहकांच्या माहिती गळतीचा संशय

# ८१ वर्षीय सेवानिवृत्त खातेदाराची दोन अनधिकृत व्यवहारांद्वारे २,६२४ रुपयांची रक्कम काढली

■ *(प्रतिनीधी वरूड दर्पण)*

**मोर्शी** – स्टेट बँक ऑफ इंडियाच्या ग्राहकांच्या वैयक्तिक माहितीच्या संभाव्य गळतीचा प्रकार समोर आला असून, प्राथमिक तपासात ३,८९७ ग्राहकांशी संबंधित माहिती डार्क वेबवर आढळल्याची माहिती आहे. या पार्श्वभूमीवर मोर्शी येथील ८१ वर्षीय सेवानिवृत्त ज्येष्ठ नागरिक सुरेशराव टवलारे यांच्या बँक खात्यातून दोन वेळा अनधिकृत व्यवहार झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, १९ ऑक्टोबर रोजी टवलारे यांच्या खात्यातून अनुक्रमे १,१२४ रुपये आणि १,५०० रुपये असे एकूण २,६२४ रुपये काढण्यात आले. या व्यवहारांनंतर त्यांच्या खात्यात केवळ ९४ रुपये शिल्लक राहिल्याचे सांगण्यात आले. या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर टवलारे यांनी बँकेत जाऊन चौकशी केली. तसेच काढलेली रक्कम परत मिळावी, यासाठी निवेदन देण्याचा प्रयत्न केला. मात्र, बँक अधिकाऱ्यांनी निवेदन स्वीकारले नाही आणि हा विषय बँकेच्या अखत्यारीतील नसल्याचे सांगितल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच पैसे कोणी काढले, याची घरी जाऊन चौकशी करण्याचा सल्ला देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, डार्क वेबवर आढळलेल्या कथित माहितीमध्ये ग्राहकांची नावे, मोबाइल क्रमांक, जन्मतारीख, ई-मेल आयडी, घराचे पत्ते, बँक शाखांची माहिती, काही ग्राहक ओळख क्रमांक आणि कर्जाशी संबंधित नोंदींचा समावेश असल्याचे सांगितले जात आहे. या माहितीचा स्रोत आणि संभाव्य परिणाम यांचा तपास सुरू असल्याची माहिती आहे. तथापि, टवलारे यांच्या खात्यातील अनधिकृत व्यवहारांचा या कथित माहिती गळतीशी थेट संबंध असल्याचे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

बँक ग्राहकांचा पैसा सुरक्षित असल्याची हमी देत असताना, ग्राहकांच्या वैयक्तिक माहितीच्या सुरक्षिततेबाबतही तितकीच दक्षता घेतली जाते का, असा प्रश्न या घटनेमुळे उपस्थित होत आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांच्या खात्यातून अनधिकृत व्यवहार झाल्यास त्यांना त्वरित मदत आणि योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. टवलारे यांची रक्कम परत मिळणार का आणि या व्यवहारांची चौकशी कोण करणार, याकडे आता लक्ष लागले आहे.

# सातारा जिल्हा बँकेच्या नऊ जागा बिनविरोध

### दहा वर्षांच्या संचालकपदाचा दिग्गजांना फटका, निवडणुकीत मोठी माघार

■ *(प्रतिनिधी वरूड दर्पण)*

**कराड** – सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी मोठ्या राजकीय घडामोडी घडल्या. सलग दहा वर्षे संचालकपदावर राहिलेल्या व्यक्तींच्या पात्रतेबाबत न्यायालयीन निर्णय आणि रिझर्व्ह बँकेच्या निकषांमुळे अनेक दिग्गजांनी निवडणुकीतून माघार घेतली. यामध्ये खासदार उदयनराजे भोसले, मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, राज्यसभेचे खासदार नितीन पाटील आणि विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर यांचा समावेश आहे. माघारीनंतर २१ पैकी नऊ जागांवर बिनविरोध निवड झाली असून, उर्वरित जागांसाठी लढतींचे चित्र स्पष्ट झाले आहे. माजी आमदार प्रभाकर घार्गे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, भाजपचे आमदार मनोज घोरपडे, आमदार धैर्यशील कदम, स्मिता देशमुख, प्रदीप विधाते, कांचन साळुंखे, सुरभी भोसले, इंदिरा घार्गे आणि नितीन भरगुडे-पाटील यांच्यासह अन्य उमेदवारांनीही माघार घेतली.

# सप्तशृंग गडावर खासगी वाहनांना प्रवेशबंदी

■ *(प्रतिनीधी वरूड दर्पण)*

**नाशिक** – नाशिकमधील सप्तश्रृंगी देवीच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रातील काना कोपऱ्यातून लाखो भाविक येत असतात. अलीकडेच नवरात्रोत्सव पार पडला. नवरात्रोत्सवामध्ये मोठ्या प्रमाणावर भाविक देवीच्या दर्शनासाठी जात असतात. येत्या रविवारी कोजागिरी पौर्णिमा आहे. या दिवशी सुद्धा मंदिरामध्ये देवीच्या



दर्शनासाठी भाविक मोठ्या प्रमाणावर येत असतात. अशातच कोजागिरी पौर्णिमेनिमित्त देवीच्या गडावर दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची अलोट गर्दी लक्षात घेता, वाहतूक कोंडी टाळण्यासाठी प्रशासनाने वाहन प्रवेशबंदीच्या कालावधीत बदल केला आहे.

# ऑडिओ क्लिप पुढे आणल्याबद्दल जरांगे पाटलांचे मनापासून अभिनंदन

### वस्तुस्थिती अन सत्य उघड झालंच पाहिजे : विजय वडेट्टीवारांचा सरकारवर हल्लाबोल

■ *(प्रतिनिधी वरूड दर्पण)*

**मुंबई** – मनोज जरांगे पाटील यांनी जी ऑडिओ क्लिप दिली ती सध्या महाराष्ट्रात गाजत आहे, प्रचंड व्हायरल होत आहे. ती ऑडिओ क्लिप पुढे आणल्याबद्दल जरांगे पाटलांचे मनापासून अभिनंदन करतो, याचं कारण असं की यामुळे या सरकारचा खरा चेहरा जनतेच्या समोर आला, अशी प्रतिक्रिया काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी दिली आहे.



भाजप आणि शिंदेसेना सत्तेसाठी भुकेली आहे. आम्ही पूर्वीपासून म्हणत होतो की ओबीसी असो की मराठा असो, या समाजाला कोणाचही काढून न घेता न्याय द्यावा, कोणाचही नुकसान होऊ देऊ नये, हे आमची भूमिका होती. या दोन्ही सत्तेतील पक्षाने मुख्यमंत्री होण्यासाठी चढावर सुरू आहे. मुख्यमंत्री होण्यासाठी काहीही करावे लागले तरी स्पर्धा सुरू आहे. एकनाथभाऊ आणि देवाभाऊ यांनी ओबीसी वर्सेस मराठा वाद लावून महाराष्ट्राच्या जनतेचं वाटोळं केलं. सत्तेत येण्यासाठी यांनी दोन समाजात भांडण लावण्याचे काम केलं, त्यातून यांनी खुर्ची मिळवली आणि खुर्चीसाठी वाद सुरू आहे. असेही काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार म्हणाले.

क्लिपच्या माध्यमातून दोन पक्षातील दरी प्रचंड वाढलीय, हे कुठेही लपून राहिलं नाही दरम्यान, ही क्लिप कोणी बाहेर आणली याची चौकशी व्हायलाच पाहिजे. याची चौकशी कुठल्या स्तरावर करावी, हे दोन्ही सत्तेतील बसलेल्या लोकांनी करावे. परंतु एक गोष्ट स्पष्ट होते की यांची भांडण आता विकोपाला गेली आहे.यांना महाराष्ट्रातील प्रश्न, दुष्काळ, एमपीएससीची वाट लागली आहे, या सगळ्यांमध्ये यांना मात्र या अशा क्लिप बाहेर काढून सत्तेसाठी कुठल्या स्तरावर जावं? हे सत्तेचे भुकेले आहे. हे लोक जनतेचे नाही, हे स्पष्ट झालं आहे किंवा सत्ता मिळिवण्यासाठी कोणाचा जीव गेला काय किंवा भांडून मेले काय, यांना काही घेणंदेणं नाही हे अधोरेखित झालं आहे. विजय वडेट्टीवार म्हणाले. तर या क्लिपच्या माध्यमातून दोन पक्षातील दरी प्रचंड वाढली आहे, हे कुठे लपून राहिलं नाही, असेही ते म्हणाले.

# पोलिसांसमोरच आरोपीने महिला डॉक्टरला लगावली जोरदार थप्पड

■ *(प्रतिनीधी वरूड दर्पण)*

### डॉक्टरांकडून कारवाईची मागणी, सीसीटीव्ही व्हिडीओ व्हायरल

**वर्धा** – जिल्ह्यात वैद्यकीय तपासणीसाठी पोलिसांसोबत आलेल्या एका आरोपीने महिला डॉक्टरच्या कानशिलात लगावल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

आर्वी तालुक्यातील तळेगाव श्यामजी पंत येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात घडलेला हा प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. या घटनेमुळे सरकारी वैद्यकीय अधिकाऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत असून, आरोपीसह त्याला आरोग्य केंद्रात घेऊन आलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांवरही कारवाई करण्याची मागणी डॉक्टरांच्या संघटनेने केली आहे.



वैद्यकीय तपासणीनंतर अचानक हल्ला ही घटना तळेगाव श्यामजी पंत येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात घडली. डॉ.श्रद्धा भुमरे यावेळी कर्तव्यावर होत्या. वृत्तांनुसार, कादिर अली रज्जाक अली असे आरोपीचे नाव आहे. न्यायालयात हजर करण्यापूर्वी त्याची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी पाच पोलिस कर्मचारी त्याला आरोग्य केंद्रात घेऊन आले होते. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीची वैद्यकीय तपासणी पूर्ण झाल्यानंतर त्याला आवश्यक कागदपत्रांवर स्वाक्षरी करण्यास सांगण्यात आले. त्याने स्वाक्षरी केल्यानंतर अचानक डॉ.भुमरे यांच्याकडे वळून त्यांच्या कानशिलात लगावल्याचा आरोप आहे. घटनेनंतर उपस्थित पोलिस कर्मचाऱ्यांनी हस्तक्षेप करून आरोपीला आवरले. मात्र, आरोग्य केंद्रात अचानक घडलेल्या या प्रकारामुळे तेथील रुग्ण आणि कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. या संपूर्ण घटनेचा प्रकार सीसीटीव्हीमध्ये कैद झाला आहे.

आरोपी स्थानिक रहिवासी असल्याचे सांगण्यात येत असून, त्याच्याविरोधात यापूर्वीही गुन्हे दाखल असल्याची माहिती आहे. पोलिस कर्मचाऱ्यांवरही कारवाई करण्याची मागणी माध्यमांच्या वृत्तानुसार, महिला डॉक्टरवरील कथित हल्ल्यामुळे सरकारी वैद्यकीय अधिकाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.




